माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२४/M/००१४९२**

**अपिलार्थी श्रीम. आरती गुप्ता**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई
कक्ष क्र. ६९-ए, तळ मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपनिबंधक**
उपनिबंधक, सहकारी संस्था, के/पश्चिम विभाग, मुंबई
कक्ष क्र. ६९-ए, तळ मजला, गृहनिर्माण भवन, वांद्रे (पूर्व)
मुंबई- ४०० ०५१

**<u>व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०९.२०२५</u>**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०१.०७.२०२२ | ०४.०८.२०२२ | ०२.०१.२०२३ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०१.०४.२०२४ रोजीच्या अर्जांन्वये प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेश पारित केलेले नाहीत असे कारण नमूद करुन मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र या कार्यालयाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. मा. मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र कार्यालयाने सदर व्दितीय अपील दि. १६.०५.२०२४ रोजीच्या पत्रान्वये राज्य माहिती आयोग, बृहन्मुंबई खंडपीठाकडे हस्तांतरीत केले.

अपिलार्थी यांनी दि. ०१.०७.२०२२ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *"श्री. गितांजली को. ऑप. हौसिंग सोसा.लि., जे.पी. रोड, वासवानी मार्ग, सात बंगला, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०० ०६१ या संस्थेच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९अ अन्वये दप्तर तपासणी घेण्याकरीता दि. ०२.०५.२०२२ रोजी दिलेल्या आदेशाचे अनुषंगाने (१) तपासणी अहवाल. (२) तपासणी अहवालाचा तपशिल. (३) तपासणी अहवालासोबत सादर केलेली कागदपत्रे. (४) कलम ८९अ अन्वये तपासणी अहवालाच्या अनुषंगाने करण्यात आलेली कारवाईची माहिती. (५) तपासणी अधिकारी यांनी तपासणी घेतल्याची तारीख व वेळ याची माहिती. (६) संस्थेच्या व्यवस्थापक समितीची यादी व लेखापरीक्षण अहवालाची प्रत याबाबतच्या माहितीची मागणी केलेली होती."*

..२/-

जन माहिती अधिकारी यांनी उत्तर दिले नाही म्हणून अपिलार्थींनी दि. ०२.०१.२०२३ रोजी प्रथम अपील दाखल केले.

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले की, त्यांनी दि. ०४.०८.२०२२ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थींना कळविले की, या कार्यालयाने दि. ०२.०५.२०२२ रोजीच्या आदेशान्वये श्री. गितांजली को. ऑप. हौसिंग सोसा.लि., जे.पी. रोड, वासवानी मार्ग, सात बंगला, वर्सोवा, अंधेरी (पश्चिम), मुंबई – ४०० ०६१ या संस्थेच्या दप्तराची तपासणी घेण्यासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९अ अन्वये नियुक्त केलेले तपासणी अधिकारी श्री. जी. पी. महाजन यांनी अद्याप संस्थेच्या दप्तर तपासणी अहवाल या कार्यालयास सादर केलेला नाही. सबब आपण संस्थेच्या दप्तर तपासणीच्या अनुषंगाने उपरोक्त प्रमाणे मागणी केलेली माहिती आपणास पुरविता येत नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असेही सादर केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश अभिलेखावर उपलब्ध नाहीत. परंतु, त्यांनी असे सादर केले की, तत्कालिन तपासणी अधिकारी यांनी तपासणी अहवाल सादर न केल्याने जानेवारी २०२५ मध्ये संबंधीत संस्थेवर अन्य तपासणी अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली होती व सदर तपासणी अधिकारी यांनी तपासणी अहवाल सादर केला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी जानेवारी २०२५ रोजीच्या आदेशान्वये नियुक्त तपासणी अधिकारी यांनी कार्यालयास सादर केलेले तपासणी अहवालाची प्रत तसेच सदर अहवालावर करण्यात आलेली कार्यवाहीची माहिती अपिलार्थींना आदेशप्राप्तीच्या १५ दिवसांत माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ७(६) अन्वये नोंदणीकृत टपालाने निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**१) जन माहिती अधिकारी यांनी वरील विवेचनानुसार कार्यवाही करावी.**

**२) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

प्रदीप व्यास
10-9-2025

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १०.०९.२०२५**

State Information Commission
सत्यमेव जयते
Greater Mumbai